■ e-paper.diwanews.com ■ सोमवार, १० जून २०२४ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 www.diwanews.com


# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

वर्ष–३

अंक–४५

संपादक : सुहास खंडागळे


## कल्याण ग्रामीण विधानसभेत शिवसेना ठाकरे गटाची पिछेहाट!

(वाचा पान ३ वर)



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. १० जून २०२४
पान : २
www.diwanews.com

# मुख कर्करोगावरील शासकीय रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया



## रुग्ण महिलेने पाणावलेल्या डोळ्यांनी मायेची थाप डॉक्टरांच्या पाठीवर मारली

**ठाणे:** एकीकडे लोकसभा निवडणुकीच्या निकालाची धामधूम सुरू असताना दुसरीकडे मात्र ठाणे जिल्हा शासकीय ( विठ्ठल सायन्ना) रुग्णालयात मुख कर्करोगावरील शस्त्रक्रिया करत अनोख्या इतिहासाची नोंद झाली. चक्क शासकीय जिल्हास्तरीय रुग्णालयात एका ५८ वर्षीय महिलेवर कमांडो ही मुख कर्करोगावरील शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आला. ही शस्त्रक्रिया जवळपास चार ते साडेचार तास सुरू होती. सद्यस्थितीत रुग्णावर रुग्णालयात डॉक्टरांच्या निगराणीखाली उपचार सुरू असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. दरम्यान शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्या ५८ वर्षीय महिलेला अश्रू अनावर झाले आणि त्यांनी त्याच पाणावलेल्या डोळ्यांनी मायेची थाप देत डॉक्टर पवार यांच्यासाठी कृतज्ञता व्यक्त केली.

ठाण्यातील एक तंबाखूच्या सेवनाने ग्रासलेली ५८ वर्षीय महिला खासगी रुग्णालयातील खर्चिक असल्याने त्या ठाण्याच्या विठ्ठल सायन्ना सामान्य रुग्णालयात दाखल झाल्या. त्यानंतर त्यांची प्रथमदर्शनी पाहणी करून ठाणे जिल्हा दंत शल्यचिकित्सक डॉ.अर्चना पवार यांनी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. डॉ. पवार यांनी मुख कर्करोग चिकित्सक डॉ. हितेश सिंघवी यांच्या सहकार्याने पहिल्यांदाच ठाणे जिल्हा रुग्णालयात कमांडो शस्त्रक्रिया यशस्वी केली. कमांडो शस्त्रक्रियेत मुखकर्करोग मुळे मानेकडील गाठ व जिभेचा संसर्गित भाग कापून बाहेर काढण्यात आला. अशाप्रकारचे शिवधनुष्य डॉ अर्चना पवार यांनी अतिशय लीलया पेलले आणि उत्कृष्ट अशी शस्त्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्हाशल्यचिकित्सक डॉ कैलास पवार यांनी त्या टीमचे अभिनंदन केले.

*संबंधित रुग्ण महिला या रोगाच्या उपचारार्थ खासगी रुग्णालयात गेल्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी अडीच लाख रुपये खर्च सांगण्यात आला. त्यामुळे तो खर्च जास्त असल्याने त्या मालवणी रुग्णालयात गेल्यावर त्यांना ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. तेथे आल्यावर त्यांच्या सर्व तपासण्या केल्यानंतर, या शस्त्रक्रियेचे शिवधनुष्य घेऊन ती यशस्वी करण्यात आली. सद्यस्थितीत त्या रुग्णालयात उपचार घेत असून लवकरच त्यांना घरी सोडण्यात येणार आहे.*

*– कैलास पवार, जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे*

# दिवा शहरातील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी दिव्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सुसज्ज ग्रंथालय व अभ्यासिका उभारा, विकास इंगळे यांची मागणी



## शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने बहुउद्देशीय सभागृह व्हावे अशीही भूमिका

**दिवा:–** दिवा शहरात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने विद्यार्थ्यांसाठी प्रशस्त अभ्यासिका, ग्रंथालय त्याचबरोबर बहुउद्देशीय सभागृह व्हावे अशी भावना येथील संविधान प्रेमी जनतेची आहे असे मत आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते विकास इंगळे यांनी व्यक्त केले आहे.

दिवा शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे. येथील विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज अशी अभ्यासिका दिवा शहरात नाही. सर्वसामान्य कुटुंबातील नागरिक दिव्यात राहतात. येथील नागरिकांच्या उज्वल भविष्याचा विचार करून दिवा शहरातून विविध शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयी सुविधा साठी या शहरातच भव्य अभ्यासिका,ग्रंथालय वाचनालय त्याचबरोबर बहुउद्देशीय सभागृह डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने उभारले जावं अशी म ागणी आपण पालिकेकडे विशेष सह्यांची मोहीम घेऊन करणार असल्याची माहिती विकास इंगळे यांनी दिली.

दिवा शहरात येथील तरुण तरुणींच्या दृष्टीने उज्वल भविष्यासाठी उत्तम दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे.

येथील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षणासाठी व सुसज्ज अशा वाचनालय व ग्रंथालयांसाठी ठाणे डोंबिवली या शहरांवर सध्या अवलंबून राहावं लागतं. दिवा शहराची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन येथील विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी याच शहरात ज्ञानाचे प्रेरणास्थान असणाऱ्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने भव्य ग्रंथालय, वाचनालय व अभ्यासिका महापालिकेमार्फत सुरू झाल्यास त्याचा फायदा येथील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना होईल असा विश्वास विकास इंगळे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक–सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १० जून २०२४
पान : ३
www.diwanews.com

## कल्याण ग्रामीण विधानसभेत शिवसेना ठाकरे गटाची पिछेहाट!

**दिवा:–** कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ठाकरेंच्या शिवसेनेला धक्का बसला असून महायुती जवळपास ७५ हजारच्या मताधिक्याने या मतदारसंघात पुढे असल्याने कल्याण ग्रामीण मतदारसंघ ठाकरे गटाच्या शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला नसल्याचे स्पष्ट होत आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे प्रभावी नेतृत्व मागील दोन वर्षात येथे निर्माण न होऊ शकल्याने त्याचा फटकाही ठाकरेंच्या शिवसेनेला बसला आहे. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांना कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून जवळपास ७५ हजाराची लीड मिळाले. सध्या या मतदारसंघात मनसेचे आमदार आहेत. याआधी हा मतदारसंघ ठाकरेंच्या शिवसेनेकडे होता. मागील विधानसभा निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेला येथे काही हजाराच्या फरकाने पराभव पत्करावा लागला होता. मात्र नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाच्या शिवसेनेपेक्षा शिंदे गटाच्या शिवसेना उमेदवाराला जवळपास ७५००० ची लीड मिळाल्याने या मतदारसंघातील निवडणूक ठाकरे गटासाठी सोपी नाही हे स्पष्ट होत आहे.

## श्रीकांत शिंदे यांच्या विकासाच्या व्हिजनला लोकांनी साथ दिली

### कल्याण लोकसभा निरीक्षक रमाकांत मढवी



**दिवा:–** कल्याण लोकसभेतील मतदारानी मागील दहा वर्षात झालेल्या विकास कामांची पोचपावती म्हणून तिसऱ्यांदा डॉक्टर श्रीकांत शिंदे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून दिले,अशी प्रतिक्रिया शिवसेनेचे कल्याण लोकसभा निरीक्षक रमाकांत मढवी यांनी दिली.

ज्या दिवशी निवडणूक अर्ज भरला त्याच दिवशी डॉक्टर श्रीकांत शिंदे यांचा विजय निश्चित झाला होता. कल्याण लोकसभा क्षेत्रात केलेली प्रचंड विकास कामे,येथील सर्वसामान्य जनतेसाठी सातत्याने विविध विकासात्मक प्रकल्प राबवण्याची भूमिका,यामुळेच डॉक्टर श्रीकांत शिंदे यांना तिसऱ्यांदा मतदारांनी निवडून दिले असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासाच्या व्हिजनचा हा विजय असल्याचे मत रमाकांत मढवी यांनी व्यक्त केले.

## नालेसफाईचा गाळ उचलण्यात यावा व गटारांची तुटलेली झाकणं तातडीने लावा

### ज्योती पाटील यांचे प्रभाग समितीला पत्र



**दिवा:–दिवा प्रभाग समिती अंतर्गत महापालिकेने मोठे नाले काही ठिकाणी साफ केले आहेत मात्र त्याचा गाळ तिथून उचललेला नाही. परिणामी दुर्गंधी पसरू नये यासाठी सदर गाळ तातडीने उचलण्यात यावा व प्रभागातील गटारांना झाकणं लावण्यात यावी अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी प्रभाग समिती सहाय्यक आयुक्तांकडे केली आहे.**





ज्योती पाटील यांनी याबाबत दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त यांना लेखी पत्र दिले आहे. या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, महापालिकेमार्फत दिवा शहरातील मोठे नाले काही ठिकाणी साफ करण्यात आले आहेत.यातून जो गाल काढलेला आहे तो त्याच जागी असून यातून दुर्गंधी पसरत असल्याचे म्हटले आहे.पावसाळ्यात हा गाळ न उचलला गेल्यास तो पुन्हा गटारात जाईल त्याचबरोबर रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.दिवा शहरातील बेडेकर नगर मध्ये नाले गटारे बांधण्यात आली आहेत, मात्र त्याची झाकणे तुटलेली आहेत तरी या गटारांवरील झाकणे लावण्यात यावीत व संभाव्य अपघात टाळण्यात यावेत अशी मागणी ज्योती पाटील यांनी या पत्रात केली आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!

दिवा न्यूज

सोमवार, दि. १० जून २०२४

पान : ४

www.diwanews.com

# अखेर गायमुख घाट रस्त्याचे काम पूर्ण



## रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाहतुक झाली सुरू

**ठाणे:** घोडबंदर रोडवरील गायमुख घाट रस्त्याचे काम वेळेत पूर्ण झाल्याने या घाट रस्त्यावरील दोन्ही बाजूंनी शनिवारी सकाळपासूनच वाहतुक सुरळीत सुरू झाली आहे. दरवर्षी पावसाळ्यात होणारी वाहतूक कोंडी यंदाच्या पावसाळ्यात सुरळीत धावणार असल्याचे सांगण्यात येत आहे. याचदरम्यान वाहतुकीचे नियम धाब्यावर बसविणाऱ्या दोन हजार २२६ अवजड वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय काळात सर्व सामान्य नागरिकांची गैरसोय झाल्याबद्दल ठाणे शहर पोलिसांतर्फे दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे.

ठाण्यातील घोडबंदर रोडच्या दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत २४ मे २०२४ पासून हाती घेतले होते. याचदरम्यान अवजड वाहनांकरिता पर्यायी मार्ग उपलब्ध करून देत, त्या रोडच्या दुरुस्ती सुरू करून प्रथम मीरा-भाईंदर कडील काम २९ मे २०२४ रोजी पर्यंत तर ३० मे पासून ०७ जून २०२४ रोजी पर्यंत गायमुख घाटातील एकेरी वाहतूक रस्ता बंद करून दुसऱ्या सिंगल रस्त्यावर वळवून मिरा भाईंदर परिसरतील वाहतूक इंडियन ऑईल पेट्रोल पंपसमोर वाहतुकीसाठी व ठाणेकडील वाहतूक जे कुमार इंफ्रा येथे २५-२५ मिनिटे थांबवून वाहतूक सुरू ठेवली होती. तर शनिवारी सकाळी हा घाट रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला असून सध्या दोन्हीं बाजूने वाहनांची वाहतूक सुरळीत सुरु झाल्याची माहिती ठाणे शहर वाहतुक विभागाचे पोलीस उपायुक्त विनयकुमार राठोड यांनी दिली.

# आपत्ती काळातील मदतीसाठी प्राधिकरणाची तयारी




## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून पूरग्रस्त व दरडप्रवण गावांना स्ट्रेचर, लाईफ जॅकेटचे वाटप



**ठाणे –** ठाणे जिल्ह्यात पावसाळ्यात घडणाऱ्या आपत्तीच्या वेळेस तातडीने मदत पोचावी, तसेच आपद्ग्रस्तांना संकटातून बाहेर काढण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सज्ज झाले आहे. आपत्कालीन परिस्थितीत संकट निवारणासाठी पूरप्रवण व दरडप्रवण गावांना स्थानिक प्रशासनामार्फत फोल्डिंग स्ट्रेचर, बहुद्देशीय लाईफ जॅकेट, रेस्क्यू किट, डिझाटर किट, बॉडी कव्हर बॅग आदी आवश्यक साहित्याचे वाटप प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी यांनी दिली आहे.

पावसाळ्याच्या काळात ठाणे जिल्ह्यात दरड कोसळणे, पूरपरिस्थिती निर्माण होणे, अतिवृष्टी, चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्ती येण्याची संभावना असते. अशा नैसर्गिक आपत्ती काळात तातडीने मदत पोहचविणे व संकटग्रस्तांना संकटातून बाहेर काढण्यासाठी विविध साहित्याची आवश्यकता असते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून अशा प्रकारचे साहित्य स्थानिक स्वराज्य संस्था, तहसील कार्यालयांना वाटप करून हे साहित्य दरडप्रवण गावे, पूररेषेजवळील गावांना दिले जाते. या वर्षी प्राधिकरणाच्या वतीने मोठ्या प्रमाणात साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. यामध्ये फोल्डिंग मल्टिपर्पज स्ट्रेचर (१७०५ संच), फ्लोटिंग अँड फोल्डिंग स्ट्रेचर व इतर साहित्य (७१० संच), आपत्ती व्यवस्थापन किट साहित्य/रेस्क्यू किट (५५० संच), बहुद्देशीय बॉडी कव्हर बॅग (१२६० संच) आणि नाविन्यपूर्ण जीवरक्षक जॅकेट (११९० संच) या साहित्याचा समावेश आहे.

यामध्ये ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महापालिका, मिरा भाईंदर महापालिका, भिवंडी-निजामपूर महापालिका, उल्हासनगर महापालिका, अंबरनाथ नगरपरिषद, कुळगाव बदलापूर नगरपरिषद यांना प्रत्येकी ६० बहुद्देशीय स्ट्रेचर (मोठे), २५ मध्यम आकाराचे स्ट्रेचर, ४० फ्लोटिंग अँड फ्लोडिंग स्ट्रेचर, २५ डिझास्टर मॅनेजमेंट किट, ६० बहुद्देशीय नाविन्यपूर्ण लाईफ जॅकेट, ५० बहुद्देशीय बॉडी कव्हर बॅग (मोठे) आणि १० बहुद्देशीय नाविन्यपूर्ण लाईफ जॅकेट, ५० बहुद्देशीय बॉडी कव्हर बॅग (मोठे) देण्यात आले आहेत. तर ठाणे, कल्याण, भिवंडी, अंबरनाथ, उल्हासनगर, शहापूर, मुरबाड तहसील कार्यालये व मीरा भाईंदर अपर तहसील कार्यालयांना प्रत्येकी १०० बहुद्देशीय स्ट्रेचर (मोठे), ४० मध्यम आकाराचे स्ट्रेचर, ५० फ्लोटिंग अँड फ्लोडिंग स्ट्रेचर, ५० डिझास्टर मॅनेजमेंट किट, १०० बहुद्देशीय नाविन्यपूर्ण लाईफ जॅकेट, १०० बहुद्देशीय बॉडी कव्हर बॅग (मोठे) आणि १० बहुद्देशीय नाविन्यपूर्ण लाईफ जॅकेट, ५० बहुद्देशीय बॉडी कव्हर बॅग (मोठे) देण्यात आले आहेत. डोंबिवली येथे झालेल्या स्फोटाच्या घटनेच्या वेळी डोंबिवली महानगरपालिकेला यापूर्वी दिलेल्या अशा साहित्यांचा मोठा उपयोग झाला आहे. तसेच यापूर्वीही झालेल्या विविध आपत्तीकाळातही या साहित्यांचा उपयोग होत आहे. एखादी व्यक्ती उंच इमारतीवर अथवा आगीत अडकली तर त्या व्यक्तिला सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी हे स्ट्रेचर उपयुक्त ठरणार आहे. तसेच हे स्ट्रेचर पाण्यावर तरंगणारे असल्यामुळे पूर परिस्थितीत त्याचा उपयोग होणार आहे. रेस्क्यू रोपद्वारे इमारतीमधून अथवा अडचणीच्या जागेतून/दऱ्या खोऱ्यातून सुखरुपणे काढण्यासाठी उपयोग होणार आहे.

फोल्डिंग मल्टीपर्पज स्ट्रेचर (संसर्ग रोधक) सोबतच या सोबतच्या किटमध्ये अंबू बॅग, कार्बन मास्क, हँड ग्लोज, सॅनिटायझर, शिट्टी, प्रेशर बँडेज/सेनेटरी पॅडस कॉडियेट पाईप, नेक बेल्ट, रेस्क्यू रोप, लिक प्रूफ लगेज बॅग, ऑईनमेंट, कापूस आदी साहित्याचा समावेश आहे.

रेस्क्यू किटमध्ये अनेक छोट्या मोठ्या जीवनरक्षक सुरक्षित नावीन्यपूर्ण साधनांचा समावेश आहे. त्यामुळे हा संच शोध व बचाव पथक पोहचण्यापूर्वी उपयोगात येऊन जीवित व वित्त हानी टाळण्यास उपयुक्त ठरणार आहे. या संचामध्ये कार्बन मास्क, हँड ग्लोज, कॉम्पॅक्ट स्ट्रेचर, रिचार्जेबल रेस्क्यू टॉर्च, नेक बेल्ट, शिट्टी, रोलर बँडेज, लाल रंगाचे त्रिकोणी तसेच मेडिकेटेड बँडेज, सक्शन पंप, जखम साफ करण्यासाठी व निर्जंतुकीकरण करण्यासाठी औषध, रेस्क्यू रोप, टूल किट, टूल किट, सीपीआर मास्क सर्च लॅम्प आदी सुमारे ३४ उपयुक्त साहित्यांचा समावेश आहे.

## पाण्यासाठी माजी विरोधीपक्ष नेते शानू पठाण यांचे आयुक्तांच्या दालनासमोरच ठिय्या आदोलन

**ठाणे :** ठाणे, मुंब्रा-कौसा भागात गेल्या चार दिवसांपासून पाणीच सोडण्यात येत नाही. पाणीपुरवठा करणाऱ्या एमआयडीसी आणि स्टेमचा शटडाऊन संपल्यानंतरही पाणी सोडण्यात येत नसल्याने संतप्त झालेले ठाणे महापालिका माजी विरोधीपक्ष नेते अश्रफ (शानू) पठाण यांनी पालिका आयुक्त सौरव राव यांच्या दालनासमोरच ठिय्या आंदोलन केले. त्यामुळे पालिका मुख्यालयात बराच गोंधळ माजला होता.

धरणातील पाणीसाठा कमी होत असल्याने दहा टक्के पाणीकपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, ठाणे शहरातील काही भाग आणि कळवा, मुंब्रा , कौसा परिसरात गेले चार दिवस पाणीपुरवठाच करण्यात येत नाही. त्यामुळे नागरिकांना टँकर्स बोलवावे लागत आहेत. त्याविरोधात शानू पठाण हे आक्रमक झाले आहेत. त्यांनी ठाणे महानगर पालिका मुख्यालयात धडक देऊन पालिका आयुक्तांच्या दालनासमोरच ठिय्या धरून बसले. त्यामुळे पालिका मुख्यालयात गोंधळ माजला होता. शानू पठाण यांच्या आंदोलनानंतर पाणी पुरवठा अभियंता विनोद पवार यांनी पठाण यांची भेट घेऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. या प्रसंगी पठाण म्हणाले की, ठाणे शहरात १० टक्के पाणी कपात करण्यात आली असली तर ९०% पाणीपुरवठा केला जात नाही. ठामपाचे काही अधिकारी टँकर लॉबीचे हित सांभाळण्यासाठी पाणी सोडत नाहीत. टँकर लॉबीकडून मोठा मलिदा मिळत असल्यानेच नागरिकांना छळले जात असून जर येत्या सोमवारपर्यंत जर पाणीपुवठा नियमित केला नाही तर पालिका आयुक्तांच्या घरासमोर दहा हजार नागरिकांसह आंदोलनाला बसू, असा इशाराही पठाण यांनी दिला.



## डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या दिव्याच्या विकासातील योगदानाची पोचपावती दिवेकरांनी मतदानातून दिली –शैलेश पाटील

**दिवा:– डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी सलग तिसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून येत हॅट्रिक मारली. त्यांच्या या विजयात दिवा शहरातील मतदारांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दिवा शहरातून श्रीकांत शिंदे यांना सुमारे ३३ हजार इतके मतदान झाले. दिवा शहरासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिलेल्या विकासाच्या योगदानाची परतफेड येथील जनतेने मतदानाच्या रूपाने केली, असे मत उपशहर प्रमुख व माजी नगरसेवक शैलेश पाटील यांनी व्यक्त केले.**



दिवा शहरात महायुतीचे सर्वच घटक पक्ष,कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी डॉक्टर श्रीकांत शिंदे यांना जास्तीत जास्त मताधिक्य मि ळावे यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले.याचीच परिणीती म्हणून दिवा शहरातून खासदार शिंदेंना मोठे मताधिक्य मिळाले.मागील पाच वर्षाच्या काळात दिवा शहराचा विकास होण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांनी मोठे योगदान दिले. शहरातील अनेक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी निधीची कम तरता पडू दिली नाही. दिवा शहरात विकासाची कामे करण्यासाठी श्रीकांत शिंदे यांनी जो पाठपुरावा केला त्याची पोचपावती येथील जनतेने मतदानाच्या रूपात दिली असे मत श्रीकांत शिंदे यांच्या विजयावर बोलताना शैलेश पाटील यांनी व्यक्त केले.



## नाले तुंबून नागरिकांच्या घरात पाणी घुसल्यास, दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त यांच्यावर निलंबनाची कारवाई करा- रोहिदास मुंडे



**दिवा:–दिव्यात नालेसफाईची कामे पूर्ण क्षमतेने झालेली नाहीत.जर या पावसाळ्यात नालेसफाई पूर्ण क्षमतेने न झाल्यामुळे नागरिकांच्या बैठ्या घरांमध्ये पाणी शिरल्यास किंवा दुर्घटना घडल्यास दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांना जबाबदार धरून निलंबित करावे अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी केली आहे.**

दिवा प्रभाग समितीचे प्रमुख अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त हे कमी पडत असून दिवा शहराचा संपूर्ण पाहणी दौरा त्यांनी पावसाल्या आधी करणे अपेक्षित होते. अनेक ठिकाणी नाल्यातील पूर्ण गाळ काढला गेलेला नाही. वरच्या प्लास्टिकच्या पिशव्या काढण्यात आलेल्या आहेत. नाले पूर्ण क्षमतेने साफ न केले गेल्याने मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्यास पाणी नागरिकांच्या घरात घुसण्याची शक्यता असते. दरवर्षी हा प्रकार पावसाळ्यात दिव्यात पाहायला मिळतो.मागील घडलेल्या घटनांवरून दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त धडा घेणार नसतील तर काम चुकार अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे अशी रोखठोक भूमिका ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी घेतली आहे.दिवा शहरात पालिका प्रशासनाचे प्रमुख म्हणून सहाय्यक आयुक्त नीट जबाबदारी पार पाडणार नसतील तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई होणे गरजेचे आहे. यामुळे प्रशासनाला शिस्त लागेल आणि दिवा शहराकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिकाऱ्यांचा बदलेल असेही रोहिदास मुंडे यांनी म्हटल आहे. दिवा शहरात जो गलिच्छपणा व अस्वच्छता अनेक ठिकाणी पाहायला मिळते त्याबाबत सुद्धा सहायक आयुक्तांनी भूमिका घेणे अपेक्षित होते मात्र ठाण्याला एक न्याय आणि दिवा शहराला एक न्याय अशा पद्धतीचे प्रशासन येथे काम करणार असेल तर अशा प्रशासनाच्या प्रमुख अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे असेही मुंडे यांनीम्हटलेआहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १० जून २०२४ पान : ६
www.diwanews.com

# छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयांची महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली पाहणी

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयांची महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नुकतीच पाहणी केली. रुग्णालयातील सोयीसुविधा आणि औषधोपचार यांच्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, असे प्रतिपादन आयुक्त राव यांनी या भेटीनंतर केले.

सरासरी १२००च्या घरात असलेली बाह्यरुग्ण संख्या सध्या २२००च्या घरात गेली आहे. त्यामुळे विनामूल्य असलेल्या औषधोपचाराचा खर्चही वाढला आहे. हा जास्तीचा खर्च महापालिका तत्काळ उपलब्ध करून देणार आहे. तसेच, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आणि राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय येथील कायम पदांच्या भरतीसाठीही जलद कार्यवाही करण्यात येत असून लवकरच ही पदे भरली जातील, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले आहे.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी रुग्णालयातील सर्व विभाग, वैद्यकीय महाविद्यालय, वसतीगृह आणि परिसराची पाहणी केली. त्यानंतर, सर्व वरिष्ठ अधिकारी आणि विभाग प्रमुख यांनी बैठक घेतली. या बैठकीत, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिरुद्ध माळगावकर यांनी रुग्णालय तसेच महाविद्यालय यांच्याविषयी सविस्तर सादरीकरण केले. बैठकीस, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (आरोग्य) उमेश बिरारी, उपायुक्त (आस्थापना) जी. जी. गोदेपुरे, उपनगर अभियंता विकास ढोले, शुभांगी केसवानी, डीन डॉ. राकेश बारोट, डॉ. स्वप्नाली कदम आदी उपस्थित होते. रुग्णालयाच्या मजबुतीकरणासाठी राज्य सरकारने ६० कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यासोबत, नवीन विद्युत व्यवस्था, ट्रान्सफॉर्मर आदी सुधारणांसाठी, वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्थलांतरासाठी आणखी निधीची गरज भासणार आहे. त्या नेमक्या गरजा, त्याचा खर्च यांचा संपूर्ण आढावा घेऊन वाढीव खर्चाचा प्रस्ताव तयार करावा, असे निर्देश यावेळी आयुक्त राव यांनी दिले.

वाढीव औषधसाठा, अपघात विभागाची क्षमतावृद्धी, अतिदक्षता विभागातील खाटांची वाढ आणि डॉक्टरांची उपलब्धता या तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यासाठी निधीची कोणतीही कमतरता जाणवणार नाही, असे आयुक्त राव म्हणाले. तसेच, पार्किंग प्लाझामधील उपलब्ध वैद्यकीय सामुग्रीचा जास्तीत जास्त वापर रुग्णालयात करावा त्यासाठी डीन आणि अधीक्षक यांनी पार्किंग प्लाझामधील सामुग्रीची तत्काळ पाहणी करावी, असे निर्देशही आयुक्त राव यांनी दिले.

रुग्णालयावर असलेला अतिरिक्त भार लक्षात घेता डॉक्टर करत असलेल्या रुग्णसेवेबद्दल आयुक्त राव यांनी कौतुक केले. रुग्णांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या माहितीचे संगणकीकरण करून ती व्यवस्था अद्ययावत करण्याबाबतही आयुक्त राव यांनी सूचना दिल्या. विविध परीक्षांमध्ये यश मिळवणाऱ्या निवासी डॉक्टरांचेही आयुक्त राव यांनी कौतुक केले. उत्तमोत्तम विद्यार्थी या महाविद्यालयात आले तर त्याचा फायदा रुग्णसेवेलाही होतो. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा आपल्या अभिमान असल्याचेही राव यांनी सांगितले.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी ठामपा प्रयत्नशील



## अतिरीक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी घेतली बैठक

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील गणेशोत्सव पर्यावरण पूरक असावा यासाठी ठामपा प्रयत्नशील आहे. त्याबाबत पर्यावरण क्षेत्रातील संस्था व तज्ज्ञ आणि पारंपरिक मूर्तिकार संघटना यांच्याशी संवाद साधण्यात येत असल्याची माहिती ठाणे महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी दिली.

अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या दालनात यासंदर्भात गुरूवारी बैठक झाली. या बैठकीस, स्वंयसेवी संस्थेतर्फे रोहित जोशी, मूर्तिकार संघटनेचे प्रतिनिधी मंगेश पंडित, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, उपमुख्य पर्यावरण अधिकारी विद्या सावंत आदी उपस्थित होते. या बैठकीमध्ये पर्यावरणस्नेही गणेशोत्सव २०२४ साजरा करण्यासाठीची पूर्वतयारी आणि नागरीकांचा सहभाग वाढविण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमांवर चर्चा झाली.

पर्यावरणपूरक गणपती मुर्तीसाठी जनजागृतीकरता, माहिती पत्रके, फलक व ध्वनीफित याद्वारे करण्यात येईल.

नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन ठाणे महापालिकेने केले आहे. पर्यावरण पूरक मूर्ती बनवून, प्लास्टिक आणि इतर हानिकारक साहित्याचा वापर टाळून आपण सर्वांनी मिळून पर्यावरणाचे रक्षण करूया, असेही आवाहन महापालिकेने केले आहे.

या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि अधिक माहितीसाठी कृपया ठाणे महानगरपालिका मुख्यालय, पर्यावरण विभाग येथे संपर्क साधावा.

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जागरूकता

महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसच्या दुष्परिणामांविषयी माहिती देणारे कार्यक्रम आणि शाडू मातीच्या मूर्ती बनवण्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. पर्यावरणपूरक गणेश मूर्ती आणि सजावटीचे साहित्य यांचे भव्य प्रदर्शन आणि विक्री आयोजित करण्यात येणार आहे.

# मुंब्र्यात पडलेल्या झाडाने दोन कारचे नुकसान

**ठाणे:** मुंब्रातील चांद नगर या ठिकाणी पार्क केलेल्या ०२ - चारचाकी वाहनांवर झाड पडले. ही घटना रविवारी मध्यरात्री सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास समोर आली यामध्ये त्या वाहनांचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत, पडलेले झाड कापून बाजूला केले. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.



## ठाण्यात १० टक्के पाणी कपात लागू

**ठाणे :** मुंबई महानगराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमधील पाणीसाठ्यात घट झाल्याने, हा साठा अधिकाधिक काळ उपयोगात यावा यादृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून मुंबई महानगरपालिकेने पाणी पुरवठ्यात १० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. ही कपात लागू झाल्याने मुंबई महापालिकेकडून मिळणाऱ्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणाऱ्या ठाणे शहरातील काही भागातही, ०५ जूनपासून १० टक्के पाणी कपात लागू झाली आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात मुंबई महापालिकेच्या स्रोतांतून ८५ एमएलडी पाणी मिळते.

# राज्यपालांच्या हस्ते दृष्टिहीन विद्यार्थ्यांना स्मार्ट चष्म्यांचे वाटप

## तंत्रज्ञान क्रांतीमुळे दिव्यांगांचे जीवन सुलभ होईल : राज्यपाल रमेश बैस

**मुंबई :** दिव्यांगांच्या जीवनात तंत्रज्ञानाच्या विकासामुळे सकारात्मक बदल होणार असून त्यांचे जीवन सुलभ होईल. दिव्यांगांकरिता कृत्रिम बुद्धिमत्ता वरदान ठरेल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज केले.

राज्यपाल बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज, शनिवारी (दि.८) मालाड, मुंबई येथे १०० दृष्टिहीन विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आधारित स्मार्ट चष्म्यांचे वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

अंदाजे वीस हजार रुपये किंमत असलेल्या स्मार्ट चष्म्यांमुळे दृष्टिहीन विद्यार्थ्यांना अभ्यास करणे, शाळेत अथवा अन्यत्र जाणे तसेच इतर दैनंदिन कामात मदत होणार आहे. या चष्म्यामध्ये लेन्स, प्रोसेसर व स्पीकरचा समावेश आहे.

जगाच्या लोकसंख्येपैकी दर आठ व्यक्तींमागे एक व्यक्ती कुठल्या ना कुठल्या प्रकारे दिव्यांग असून भारताची दोन टक्के लोकसंख्या दिव्यांग आहे. देशाला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी दिव्यांगांना आत्मनिर्भर बनविणे गरजेचे आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

दिव्यांगांची सेवा हीच नारायणाची सेवा आहे. दिव्यांग व्यक्तींना योग्य संधी मिळाली तर ते प्रत्येक क्षेत्रात चांगली कामगिरी करू शकतात, असे सांगून दिव्यांगांच्या सक्षमीकरणाबद्दल मानवाधिकार आयोग व हेतू चॅरिटेबल ट्रस्ट करीत असलेल्या कार्याबद्दल राज्यपालांनी उभय संस्थांचे कौतुक केले.

स्मार्ट चष्मे खरेदीसाठी आर्थिक सहकार्य केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा तसेच इतर दानशूर व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. राज्यपालांच्या हस्ते हेतू चॅरिटेबल ट्रस्टच्या संकेतस्थळाचे यावेळी अनावरण करण्यात आले. कार्यक्रमात ७५ दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश देखील प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाला सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश न्या. संदीप मेहता, मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. शिवकुमार डिगे व न्या.अभय आहुजा, राज्य मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष न्या. कमल किशोर तातेड (नि.) व हेतू चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव रिखबचंद जैन उपस्थित होते.



SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना

मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund
फुफ्फुस प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
अपघात शस्त्रक्रिया
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
अपघात
हृदयरोग
डायलिसिस
हाताचे प्रत्यारोपण
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
विद्युत अपघात रुग्ण
नवजात शिशुंचे आजार
बर्न रुग्ण
मेंदूचे आजार
कर्करोग शस्त्रक्रिया
Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301
Emergency
7777008464
9076229076

## यापुढेही दिव्यातील जनता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या सोबत राहील –निलेश पाटील

**दिवा:** दिव्यातील नागरिकांनी श्रीकांत शिंदे यांच्या विकासाच्या भूमिकेला पाठिंबा देत भरघोस मतदान केले. यापुढेही दिव्यातील जनता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेसोबत राहील असा विश्वास लोकसभा निकालानंतर निलेश पाटील यांनी व्यक्त केला. खासदार श्रीकांत शिंदे यांनी त्यांच्या कार्यकाळात दिवा शहरात अनेक विकास कामे मार्गी लावली. दिवा शहरातील अनेक वर्ष प्रलंबित असणारे प्रश्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व श्रीकांत शिंदे यांनी पुढाकार घेतला. जनतेची काम होत असल्यानेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेला दिवा शहरात यश मिळत असून यापुढेही येथील जनता शिवसेने सोबत राहील असा विश्वास निलेश पाटील यांनी व्यक्त केला.

